सन २०१९-२० करिता विशेष केंद्रीय सहाय्य योजने अंतर्गत मंजूर “**Parental Involvement through School Management Committees in Govt Ashram Schools and EMRS** ” या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देणेबाबत

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः केंद्रीय-२०१९/प्र.क्र.४८/का-१९
मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख: ११/०९/२०१९

संदर्भ-

१.जनजाती कार्य मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०१/२०१९-Grants,दि.११/०३/२०१९.

२. जनजाती कार्य मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र F.No.११०१५/०१(१४)/२०१९-TSP, दि. १५/०७/२०१९ व दि.२६.०८.२०१९

३.आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्र.केंद्रीय-२०१९/प्र.क्र.६३/ का.१९, दिनांक ०५/०८/२०१९ व दि.३१.०८.२०१९

प्रस्तावना-

केंद्र शासनाकडून दरवर्षी विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत अनुदान , भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत व अदिम जमाती विकास कार्यक्रम या योजनाअंतर्गत राज्य शासनास अनुदान प्रदान होत असते . या योजनाअंतर्गत प्राप्त होणा-या अनुदानासाठी नावीन्यपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्रकल्प कार्यालय,शासकीय, अशासकीय/ सामाजिक /खाजगी नामवंत संस्था यांना आदिवासी विकास विभागाकडून आवाहन करण्यात आलेले होते. यानुषंगाने प्राप्त झालेल्या प्रस्तावांची सविस्तर छाननी करून निवडक प्रस्ताव मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीकडे सादर करण्यात आले. सदर प्रस्तावामध्ये साझा संस्थेच्या प्रस्तावाचा समावेश आहे. सदर प्रस्ताव मुख्यत्वे शासकीय आश्रमशाळा व एकलव्य निवासी शाळांमधील शाळा व्यवस्थापन समितीच्या निर्णय प्रक्रियेत पालकांचा समावेश वाढविणे,शाळा व्यवस्थापन समित्या मजबूत करणे,शाळा व्यवस्थापन समितीमध्ये असणारे सदस्य व पालकांची प्रशिक्षणाद्वारे क्षमता बांधणी करणे या बाबत आहे .

२. आश्रमशाळेच्या स्तरावर असलेली शाळा व्यवस्थापन समिती मजबूत व निर्णयक्षम असेल तर शाळेचा एकंदर दर्जा सुधारेल या उद्देशातून आदिवासी विकास विभागाने मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समिती व शासनाच्या मान्यतेने ही योजना राबविण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्तावित केली. जनजाती कार्य मंत्रालयाने दिनांक १२.०२.२०१९ रोजी आयोजीत केलेल्या Project Appraisal Committee (PAC) बैठकीमध्ये “Parental Involvement through School Management Committees in Ashram Schools ” हि योजना सन २०१९-२० करिता विशेष केंद्र योजने अंतर्गत साझा संस्थेमार्फत राबविण्यासाठी एकूण रू. १०००.०० लक्ष इतक्या रकमेच्या प्रस्तावास संदर्भाधिन पत्र क्र.१ अन्वये मंजुरी दिलेली असून सदर निधी संदर्भाधिन शासन निर्णय क्र.३ अन्वये आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक यांना वितरित करण्यात आला आहे.

३. महाराष्ट्रात सद्यस्थितीत ५०२ शासकीय आश्रम शाळा, २५ एकलव्य निवासी शाळा कार्यरत आहेत. या आश्रम शाळांतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी आदिवासी विकास विभागाची आहे. सबब, आश्रम शाळेच्या स्तरावर शालेय व्यवस्थापनासाठी स्थानिक पातळीवर पुरेसे निर्णयाचे अधिकार देऊन शाळेचा एकंदर दर्जा सुधारण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीवर सोपविण्यात आली आहे.

४. साझा ही संस्था पालक व शाळा व्यवस्थापन समिती यांना जोडण्याचे कामकाज करते तसेच शाळा व्यवस्थापन समितीमध्ये नेतृत्व क्षमता वाढवण्यासाठी सरकारी शाळांबरोबर काम करीत आहे. मुलांचे शिक्षण सुधारण्यासाठी तसेच पालकांचा आणि समुदायाचा सहभाग सक्षम करण्यासाठी साझा शाळा व्यवस्थापन समितींची क्षमताबांधणी करते. साझा संस्था दिल्ली शासन आणि एससीईआरटी दिल्लीसह मोठ्या प्रमाणात काम करत आहेत. या व्यतिरिक्त साझा संस्थेने खुंटी (झारखंड) आणि हुबळी (कर्नाटक) मधील शालेय व्यवस्थापन समिती मजबूत करण्यासाठी देखील काम केले आहे. मुलांचा समग्र विकास सुनिश्चित करण्यासाठी पालकांची प्रतिबद्धता महत्त्वपूर्ण असते म्हणूनच शाळा व्यवस्थापन समिती, पालक आणि शाळा यांना जोडणारा दुवा म्हणुन मोठी भूमिका बजावत आहे.

५. साझा ने आदिवासी विकास विभागाबरोबर प्रायोगिक तत्वावर डहाणू प्रकल्पामध्ये शाळा व्यवस्थापन समिती मजबूत करण्याबाबत प्रकल्प राबवला आहे व त्याचे चांगले परिणाम निदर्शनास आले आहेत.या पार्श्वभूमीवर विभागाशी कामकाजाचा अनुभव असलेल्या व या क्षेत्रामध्ये कामाचा अनुभव असलेल्या संस्थेमार्फत विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत मंजूर "Parental Involvement through School Management Committees in Government Ashram Schools and EMRS" हि योजना साझा या संस्थेमार्फत राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांना मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय-</u>

शासकीय आश्रमशाळेत असलेल्या शाळा व्यवस्थापन समितीच्या निर्णय प्रक्रियेत पालकांचा समावेश वाढविणे, शाळा व्यवस्थापन समिती मजबूत करणे, शाळा व्यवस्थापन समिती मध्ये असणा-या पालकांची क्षमता बांधणी करणे या कार्यक्रमार्तगत "Parental Involvement through School Management Committees in Govt Ashram Schools and EMRS" ही योजना साझा संस्था व आदिवासी विकास विभाग यांच्यामार्फत संयुक्तपणे राबविण्यासाठी एकुण रु. १०००.०० लक्ष किंमतीच्या अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांना या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक १ नुसार मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतूदींच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही आयुक्त, आदिवासी विकास ,नाशिक यांनी करावी व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९११२०२३२६४२२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Shivaji Jadhav

Digitally signed by Santosh Shivaji Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f635bf4a671627c02b82e6a01acb4a38afc24f58a5534a9d1271fe258a564b0, serialNumber=b8ee819ccc335cea98640b72c63671dd013899d3601f09ce4ea340e1741652a0, cn=Santosh Shivaji Jadhav
Date: 2019.09.16 16:45:21 +05'30'

(संतोष जाधव)
कार्यासन अधिकारी

प्रत,

१) मा.मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
२) मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव,आदिवासी विकास, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई
४) आयुक्त,आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,नाशिक.
५) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
६) सहसचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
७) उपसचिव (शिक्षण) , आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक,ठाणे,अमरावती,नागपुर
९) सर्व ,प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
१०) संचालक, साझा संस्था,नवी दिल्ली
११) संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१२) निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई

विशेष केंद्रीय सहाय्य योजने अंतर्गत मंजूर योजना सन -२०१९-२०
परिशिष्ट-१

(रुपये लाखात)

<table>
<tr><td>१.</td><td>योजनेचे नाव</td><td>Parental Involvement through School Management Committees in Govt Ashram Schools and EMRS</td></tr>
<tr><td>२.</td><td>योजनेचे प्रस्तावित लाभ क्षेत्र</td><td>आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त असणा-या सर्व शासकीय आश्रम शाळा,एकलव्य निवासी शाळा व इंग्रजी माध्यम शाळा.</td></tr>
<tr><td>३.</td><td>वित्तीय तरतूद</td><td><table>
<tr><th>अ.क्र.</th><th>वर्ष</th><th>योजना</th><th>निधी (रु.लक्ष)</th></tr>
<tr><td>१</td><td>२०१९-२०</td><td>"Parental Involvement through School Management Committees in Govt Ashram Schools and EMRS"</td><td>१०००.००</td></tr>
<tr><td colspan="3">एकूण</td><td>१०००.००</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>४</td><td>योजना राबवणारी यंत्रणा</td><td>सबंधित प्रकल्प अधिकारी ए.आ.वि प्रकल्प व साझा संस्था, नवी दिल्ली</td></tr>
<tr><td>५</td><td>नियंत्रक अधिकारी</td><td>अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, ठाणे,अमरावती व नागपुर</td></tr>
<tr><td>६</td><td>योजनेचा उद्देश/ हेतु</td><td>➢ आश्रम शाळेत असणा-या शाळा व्यवस्थापन समिती बळकटीकरण करणे
➢ आश्रम शाळेत असलेल्या शाळा व्यवस्थापन समितीच्या निर्णय प्रक्रियेत पालकांचा समावेश वाढविणे.
➢ शाळा व्यवस्थापन समितीच्या कामकाजाचे सुसुत्रीकरण सुचविणे.
➢ शाळा व्यवस्थापन समिती मध्ये असणाऱ्या पालकांची क्षमता बांधणी करणे.
➢ शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून आश्रम शाळेचा सर्वांगीण विकास होण्यासाठी हातभार लावणे.</td></tr>
<tr><td>७</td><td>योजना अंमलबजावणी ची कार्यपध्दती</td><td>१.योजनेच्या अनुषंगाने साझा ही संस्था अमलबजावणी यंत्रणा म्हणून कामकाज करेल
२. मंजुर तरतुदीच्या मर्यादेत प्रकल्पाच्या खर्चाचा तपशील व अंमलबजावणी वेळापत्रक हे आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक यांनी अंमलबजावणी यंत्रणेसोबत विचारविनिमय करून अंतिम करावे.
३. योजनेच्या अनुषंगाने निवडल्या गेलेल्या प्रकल्प कार्यालयात अंमलबजावणी यंत्रणेमार्फत एका व्यक्तीची नियुक्ती केली जाईल. सदर व्यक्ती समन्वय साधण्याचे कामकाज करेल.</td></tr>
</table>

		४. सदर योजना ही तीन वर्षाच्या कालावधी करिता पुढील प्रमाणे राबविण्यात येईल. ➢ **प्रथम वर्ष –** १. योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने प्रथम वर्षी अप्पर आयुक्त, आदिवासी विकास , ठाणे व नाशिक यांच्या कार्यक्षेत्राची निवड केली जाईल . २. योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने अप्पर आयुक्त आदिवासी विकास , ठाणे यांच्या कार्यक्षेत्रातील डहाणू ,जव्हार व शहापूर तसेच अप्पर आयुक्त कार्यालय नाशिक यांच्या कार्यक्षेत्रातील नाशिक व कळवण प्रकल्प कार्यालयाची निवड योजनेच्या प्राथमिक अंमलबजावणी करिता करण्यात येईल. ३. निवडल्या गेलेल्या प्रकल्प कार्यालयातून एकूण १८ आदर्श आश्रम शाळांची निवड मॉडेल आश्रमशाळा म्हणून करण्यात येईल. यामध्ये संबंधित प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील एकलव्य निवासी शाळांचा समावेश असेल. ४. आश्रमशाळांची निवड ही सबंधित प्रकल्प अधिकारी व अंमलबजावणी यंत्रणा एकत्रितरित्या करतील. ५. निवडल्या गेलेल्या १८ मॉडेल आश्रम शाळांमध्ये अमलबजावणी यंत्रणेमार्फत शाळा व्यवस्थापन समितीच्या बळकटीकरणाबाबत सखोल व सविस्तर कामकाज केले जाईल . ६. या ठिकाणी शाळा व्यवस्थापन समिती निर्मिती त्यांचे प्रशिक्षण ,क्षमता बांधणी , निर्णय घेण्याची क्षमता, शाळा विकास आराखडा , शिक्षक ,पालक व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या जबाबदाऱ्या या बाबत अमलबजावणी यंत्रणा कामकाज करेल. ७. निवडल्या गेलेल्या १८ मॉडेल आश्रम शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन ॲप तयार केले जाईल. ८. योजनेच्या अनुषंगाने निवडल्या गेलेल्या पाचही प्रकल्प कार्यालय अंतर्गत असणाऱ्या सर्व आश्रम शाळांमध्ये अमलबजावणी यंत्रणेमार्फत शिक्षक व पालक यांची बैठक आयोजित केली जाईल. सदर बैठकीमध्ये शाळा व्यवस्थापन समितीचे महत्त्व, जबाबदारी, पालकांची जबाबदारी या बाबत चर्चा व मार्गदर्शन दिले जाईल. ९. योजनेच्या अनुषंगाने निवडल्या गेलेल्या प्रकल्प कार्यालयामध्ये ६ महिन्यांमधून एकदा शाळा व्यवस्थापन समितीची प्रकल्प स्तरावर सभेचे आयोजन केले जाईल. १०.योजनेच्या अनुषंगाने प्रकल्प कार्यालयाच्या स्तरावर वर्षातून एकदा समुदाय कार्यक्रम आयोजित केला जाईल. सदर कार्यक्रमात आश्रम शाळेजवळील गावांतील विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक, विद्यार्थी यांना एकत्र करून समुदायामध्ये शिक्षणाबाबत असणा-या समस्या , शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांच्या समस्या, पालकांच्या जबाबदा-या याबाबत चर्चा करून शाळेत विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी विद्यार्थी, पालक यांना प्रवृत्त केले जाईल.

		द्वितीय वर्ष- १) योजनेच्या अंमल बजावणीच्या अनुषंगाने द्वितीय वर्षी अप्पर आयुक्त कार्यालय अमरावती यांच्या कार्यक्षेत्रातील किंनवट, धारणी,पांढरकवडा व कळमनुरी तसेच अप्पर आयुक्त कार्यालय नागपुर यांच्या कार्यक्षेत्रातील गडचिरोली, चंद्रपुर,देवरी व अहेरी अशा एकुण ८ प्रकल्प कार्यालयांची निवड करण्यात आलेली आहे. २) निवडल्या गेलेल्या प्रत्येक प्रकल्प कार्यालयातून एकूण आदर्श आश्रम १८ .शाळांची निवड मॉडेल आश्रम शाळा म्हणून करण्यात येईलयामध्ये संबंधित प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील एकलव्य निवासी शाळांचा समावेश असेल. ३) आश्रम शाळांची निवड ही सबंधित प्रकल्प अधिकारी व अंमलबजावणी यंत्रणा एकत्रित रित्या करतील. ४) निवडल्या गेलेल्या १८ मॉडेल आश्रम शाळांमध्ये अमलबजावणी यंत्रणेमार्फत शाळा व्यवस्थापन समितीच्या मजबूत करण्याबाबत सखोल व सविस्तर कामकाज केले जाईल . ५) या ठिकाणी शाळा व्यवस्थापन समिती निर्मिती त्यांचे प्रशिक्षण ,क्षमता बांधणी , शाळा विकास आराखडा , शिक्षक ,पालक व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या जबाबदऱ्या या बाबत अमलबजावणी यंत्रणा कामकाज करेल. ६) निवडल्या गेलेल्या १८ मॉडेल आश्रम शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन ॲप तयार केले जाईल. ७) योजनेच्या अनुषंगाने निवडल्या गेलेल्या आठही प्रकल्प कार्यालय अंतर्गत असणा-या सर्व आश्रम शाळांमध्ये अमल बजावणी यंत्रणेमार्फत शिक्षक पालक यांची बैठक आयोजित केली जाईल. सदर बैठकीमध्ये शाळा व्यवस्थापन समितीचे महत्त्व, जबाबदारी, पालकांची जबाबदारी या बाबत चर्चा केली जाईल. ८) योजनेच्या अनुषंगाने निवडल्या गेलेल्या प्रकल्प कार्यालयामध्ये ६ महिन्यातून एकदा शाळा व्यवस्थापन समितीची प्रकल्प स्तरावर सभेचे आयोजन केले जाईल. ९) योजनेच्या अनुषंगाने प्रकल्प कार्यालयाच्या स्तरावर वर्षातून एकदा समुदाय कार्यक्रम आयोजित केला जाईल. सदर कार्यक्रमात आश्रम शाळेजवळील गावांतील विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक, विद्यार्थी यांना एकत्र करून समुदायामध्ये शिक्षणाबाबत असणा-या समस्या , शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांच्या समस्या, पालकांच्या जबाबदा-या याबाबत चर्चा करून शाळेत विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी विद्यार्थी, पालक यांना प्रवृत्त केले जाईल. १०) या व्यतिरिक्त प्रथम वर्षी अप्पर आयुक्त कार्यालय नाशिक व ठाणे यांच्या कार्यक्षेत्रातील निवडल्या गेलेल्या ५ प्रकल्पांतर्गत असणा-या सर्व आश्रम शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समितीसाठी अद्ययावत प्रकारचे प्रशिक्षण आयोजित केले जाईल तसेच त्या प्रकल्पांतर्गत असणा-या सर्व आश्रम शाळांसाठी शाळा व्यवस्थापन ॲप तयार केले जाईल.

		तृतीय वर्ष- १. प्रथम वर्षी व द्वितीय वर्षी निवडल्या गेलेल्या प्रकल्प कार्यालयातील सर्व आश्रम शाळा व एकलव्य निवासी शाळांमध्ये अद्ययावत (Advanced) स्वरूपाचे प्रशिक्षण अंमलबजावणी यंत्रणेमार्फत घेण्यात येईल. २. अप्पर आयुक्त ठाणे व नाशिक यांच्या कार्यक्षेत्रातील असणाऱ्या सर्व शाळा तसेच अप्पर आयुक्त अमरावती व नागपुर यांच्या कार्यक्षेत्रातील निवडल्या गेलेल्या प्रकल्पातील सर्व शाळांसाठी शाळा व्यवस्थापन ॲप तयार केले जाईल. ३. योजनेच्या अनुषंगाने शाळा व्यवस्थापन समिती मधून उत्कृष्ट कार्य करणा-या पालकांची/ समितीच्या सदस्यांची चॅम्पियन म्हणून निवड केली जाईल. भविष्यामध्ये सदर व्यक्ती संसाधन व्यक्ति म्हणून कामकाज करेल.
८	**मूल्यमापन-संनियंत्रण समिती**	योजनेच्या अंमल बजावणीच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे मूल्यमापन व संनियंत्रण समिती स्थापन करण्यात येत आहे. १)आयुक्त , आदिवासी विकास, नाशिक - **अध्यक्ष** २) अपर आयुक्त, आदिवासी विकास, सर्व - **सदस्य** ३) सबंधित प्रकल्प अधिकारी ,ए.आ.वि.प्रकल्प - **सदस्य** ४) साझा संस्था, प्रतींनिधी - **सदस्य** ५) उपायुक्त शिक्षण,आयुक्तालय, नाशिक -**सदस्य सचिव** ➢ योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने करण्यात येणारे कार्य व त्याची प्रगती या बाबत अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी उपरोक्त समितीस असतील ➢ योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून उपरोक्त समितीची बैठक दर ३ महीन्यांनी आयोजित करावी व सदर बैठकीमध्ये योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात यावा. तसेच योजना अंमबलजावणीमध्ये काही अडचणी असतील तर त्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी . ➢ समितीमध्ये आवश्यकतेप्रमाणे इतर तज्ञ/संस्था यांना निमंत्रित करता येईल.
९	**सुकाणू समिती** (steering committee)	योजनेचे कार्य सुरळीतपणे चालू राहण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाय योजना करण्यासाठी पुढील प्रमाणे सुकाणू समिती गठीत करण्यात येत आहे . १) प्रधान सचिव, आदिवासी विकास - **अध्यक्ष** २) आयुक्त, आदिवासी विकास विभाग - **सदस्य** ३) सर्व,अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग - **सदस्य** ४) डॉ मनीषा प्रियम, न्यूपा - **सदस्य** ५) डॉ. निवेदिता नरायन, प्रदान संस्था - **सदस्य** ६) डॉ मनीषा दाटे, प्रथम संस्था - **सदस्य** ७) डॉ. अँथनी डायस एसजे, ज़ेवियर्स इंस्टिट्यूट ऑफ़ सोशियल रिसर्च - **सदस्य** ८)सबंधित उप सचिव/सह-सचिव , आदिवासी विकास विभाग - **सदस्य सचिव**

		वरील सुकाणू समितीची दर सहा महिन्यांनी किंवा ठरवून दिलेली अथवा समितीने ठरवलेल्या कालावधीत बैठक होईल. सुकाणू समितीची कार्यकक्षा पुढील प्रमाणे राहील - १. योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून या समितीची बैठक दर ६ महिन्यांनी आयोजित करावी. सदर बैठकीमध्ये योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात यावा. २. साझा च्या टीमने दिलेल्या अहवाल व सादरीकरणानंतर समिती सदस्य अभिप्राय व शिफारस करतील. तसेच योजना अंमलबजावणीमध्ये काही अडचणी आल्यास समिती त्याबाबत उपायात्मक कार्यवाही सूचित करू शकते.
१०	**योजनेच्या अटी व शर्ती**	१) सदर योजनेच्या अमलबजावणीच्या अनुषंगाने उपलब्ध मंजूर निधीतच योजना पूर्ण करण्याची जबाबदारी अमलबजावणी यंत्रणेची राहील. योजनेसाठी मंजूर निधीच्या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त निधी अमलबजावणी यंत्रणेला उपलब्ध करून दिला जाणार नाही. २) योजना विहित वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेची असेल. ३) अंमलबजावणी यंत्रणेला सामंजस्य करारामध्ये नमूद सविस्तर अटी व शर्ती नुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील. ४) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आऊट सोर्सिंग करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहिल. ५) प्रकल्पामध्ये होणाऱ्या बदलाची पूर्वकल्पना प्रकल्प अधिकारी व सनियंत्रण व मूल्यमापन समितीला देऊन समितीच्या मान्यतेनेच बदल करावा. ६) प्रकल्प राबवितांना आवश्यक असणारे प्रशिक्षण/कार्यशाळा/कार्यक्रम संस्थेद्वारे खाली नमूद केले प्रमाणे देणे बंधनकारक असेल. i. प्रथम टप्पा: २ महिने: योजनेची सुरुवात प्रभावीपणे करण्यासाठी पाया तयार करणे. यात आधाररेखा सर्वेक्षण, वर्गीकरण आणि कामाची व्याप्ती नमूद करणे इत्यादींचा सहभाग असेल. ii. द्वितीय टप्पा :१० महिने २ अपर आयुक्त (ठाणे, नाशिक) यांच्या एकूण ५ प्रकल्पांमध्ये (डहाणू, जव्हार, शहापूर, नाशिक, कळवण) शाळांमध्ये कार्यक्रम सुरू करणे. iii. विस्तार टप्पा : १२ महिने ४ अपर आयुक्त (ठाणे, नशिक, अमरावती, नागपूर) यांच्या एकूण १३ प्रकल्पांमध्ये (डहाणू, जव्हार,शहापूर, नाशिक, कळवण, किनवट, धारणी, पांढरकवडा, कळमनुरी, गडचिरोली, चंद्रपूर, देवरी, अहेरी) कार्यक्रम वाढवणे iv. स्थायीकरण टप्पा : १२ महिने कार्यक्रमाला स्थिरता आणण्यासाठी आणि प्रबळ बनवण्यासाठी योजना तयार करणे. योजनेच्या पूर्णत्वाची तयारी करणे

		७. योजनेच्या अमलबजावणीच्या अनुषंगाने आश्रम शाळेत शाळा व्यवस्थापन समिती सक्रिय करणे , त्यांची निर्णय घेण्याची क्षमता वाढविणे, शाळेच्या विकास आराखडा तयार करणे, आश्रम शाळेमध्ये पालक, शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये एकसूत्रीपना आणणे, शाळा व्यवस्थापन ॲप तयार करणे व शाळा व्यवस्थापन समिती मजबूत व निर्णयक्षम तयार करणे अंमल बजावणी यंत्रणेला बंधनकारक राहील . ८.योजनेच्या प्रगतीबाबत माहिती वेळोवेळी प्रकल्प अधिकाऱ्यांना तसेच शासनास सादर करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील. ९.अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेला केलेल्या कामाचा पूर्तता अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल. १०.सदर योजनेची अंमलबजावणी करताना चलचित्र (video) व छायाचित्रे काढावीत व योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी व अंमल बजावणी यंत्रणा यांची राहील तसेच लाभार्थ्यांची यादी व Geo-tagged photographs हे www.stcmis.gov.in/smis या वेबसाईट वर अपलोड करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी यांची राहील. ११.योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने योजनेच्या प्रगती बाबत माहिती वेळोवेळी CAS पोर्टल वर भरण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची असेल
११	**योजनेची अंमलबजावणी चा कालावधी**	योजनेचा एकुण कालावधी - ०३ वर्ष
१२	**निधी वितरणाची कार्य पद्धती**	सदर योजनेकरिता निधी वितरणाची कार्यपद्धती खालील प्रकारे निश्चित करण्यात येत आहे. ➢ योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मंजूर झालेल्या रकमेच्या मर्यादेत खर्च करण्याची जबाबदारी अमलबजावणी यंत्रणेची असेल. योजनेसाठी इतर कोणताही अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही याची दक्षता अंमलबजावणी यंत्रणेनी घ्यावी ➢ सदर योजनेचा निधी हा आयुक्त,आदिवासी विकास नाशिक, यांच्यामार्फत अमलबजावणी यंत्रणेला वितरित करण्यात येईल. ➢ शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक हे अमलबजावणी यंत्रणेला कार्याचा आदेश देऊन प्रकल्पाच्या प्रथम वर्षीच्या आवश्यक निधीच्या ७० टक्के निधी वर्ग करतील. ➢ कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर व सदर निधी प्राप्त होताच व अंमलबजावणी यंत्रना प्रत्यक्षात कार्यास सुरुवात करेल . ➢ प्रत्यक्ष कार्य सुरु होऊन ६ महिने झाल्यानंतर व कामाच्या प्रगतीनुसार प्रथम वर्षीच्या आवश्यक निधीच्या उर्वरित ३० टक्के रक्कम अंमलबजावणी यंत्रणेला वर्ग करतील.

		➢ उपरोक्त पद्धतीनुसार मूल्यमापण व संनियंत्रण समितीच्या शिफारशी नुसार व योजनेच्या प्रगतीनुसार दुस-या वर्षासाठी आवश्यक असलेला निधी अंमलबजावणी यंत्रणेला वर्ग करतील. ➢ तिस-या वर्षीच्या आवश्यक निधीच्या ७० टक्के निधी हा वर्षाच्या सुरूवातीला योजनेच्या प्रगतिनुसार व मूल्यमापण व सनियंत्रण समितीच्या शिफारशीनुसार अमलबजावणी यंत्रणेला वर्ग करण्यात येईल ➢ उर्वरित ३० टक्के निधी हा योजनेची अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर व कार्य पूर्तता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर व मूल्यमापण व सनियंत्रण समितीने समाधानकारक शिफारस केल्यानंतर अमलबजावणी यंत्रणेला वर्ग करण्यात येईल. ➢ योजनेच्या अनुषंगाने आऊटसोर्सिंग करण्यात येणारे संसाधन व्यक्ती व कर्मचारी यांचे मानधन देण्याची संपूर्ण जबाबदारी अंमल बजावणी यंत्रणेची राहील . ➢ योजनेच्या अनुषंगाने झालेल्या खर्चाचा अहवाल वेळोवेळी आयुक्त आदिवासी विकास यांना सादर करण्याची जबाबदारी योजना राबवणाऱ्या यंत्रणेची राहील . ➢ योजनेच्या अनुषंगाने शालेय शिक्षा समिती सदस्य व शिक्षक यांच्यासाठी प्रकल्प स्तरावर आयोजित करण्यात येणा-या शिक्षक पालक सभा, समुदाय कार्यक्रम यावर होणारा खर्च व प्रशिक्षण स्थळाचा खर्च हा प्रकल्प अधिकारी यांनी करावा. तसेच आश्रमशाळेतील शिक्षक यांचा दैनिक भत्ता व प्रवास खर्च नियमानुसार प्रकल्प अधिकारी यांनी अदा करावा . तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांचा प्रवास खर्च हा शाळा व्यवस्थापन समिती साठी असलेल्या निधीतून मुख्याध्यापक यांनी करावा.
१३	**योजनेची फलनिष्पती**	➢ निवडलेले शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समिती गठीत करणे. ➢ आश्रम शाळेत असलेल्या शाळा व्यवस्थापन समितीच्या निर्णय प्रक्रियेत पालकांचा समावेश वाढेल. ➢ शाळा व्यवस्थापन समिती निधीचे योग्य पद्धतीने नियोजन आणि खर्च करण्यासाठी समिती सदस्यांमध्ये क्षमता बांधणी करण्यात येईल. ➢ आश्रमशाळेत असणा-या शाळा व्यवस्थापन समिती मजबूत होतील. ➢ शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून आश्रमशाळांचा सर्वांगीण विकास होईल.